## परीक्षेची वैशिष्ट्ये

१) किमान १०० विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी करणाऱ्या शाळा / महाविद्यालयास परीक्षा–केंद्र म्हणून मान्यता.

२) लोकसेवा आयोग परीक्षेच्या आकृतिबंधाप्रमाणे परीक्षेचे नियोजन.

३) प्रश्नपत्रिकेत मराठी भाषेचा पर्याय उपलब्ध.

४) विद्यार्थी जीवनातच स्पर्धा परीक्षांविषयी कुतूहल निर्माण करणारी अभिनव कल्पना.

५) कनिष्ठ व वरिष्ठ विभागासाठी स्वतंत्र गुणवत्ता यादी, समान रोख पारितोषिके आणि प्रमाणपत्रे.

६) परीक्षा प्रक्रियेमध्ये समाविष्ट झालेल्या सर्वांना श्रेणीनुसार मानधन.

७) २१ जानेवारी २०२३ रोजी परीक्षेचा निकाल य.मो. महाविद्यालय, पुणे येथे जाहीर.

८) सर्व केंद्रांना ई–मेलद्वारे निकाल पोचवण्याची व्यवस्था.

**टीप : स्पर्धा–परीक्षेसंदर्भात सर्व अधिकार महाविद्यालय व संयोजकांकडे राखीव.**










**गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन**

**शैक्षणिक वर्ष : २०२२–२३** **वर्ष ३९ वे**

# ऑनलाईन

## राष्ट्रस्तरीय आंतरमहाविद्यालयीन सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा - २०२३



## डॉ. पतंगराव कदम

*संस्थापक, भारती विद्यापीठ, पुणे*

*संस्थापक-कुलपती, भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय), पुणे*

## यांच्या जयंतीनिमित्त आयोजित सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा - २०२३

**भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय)**

## यशवंतराव मोहिते कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, एरंडवणे, पुणे-३८

★ राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद यांचेकडून मूल्यांकनात 'A+' दर्जा प्राप्त. (२०१७) ★

★ एम्.एच्.आर्.डी. यांचेकडून विद्यापीठास 'अ' दर्जा प्राप्त. ★

**ई–मेल : ymcgkt@gmail.com**
**वेबसाईट : ymc.bharatividyapeeth.edu**

सप्रेम नमस्कार,

यशवंतराव मोहिते महाविद्यालयाला एक उज्वल परंपरा आहे. या महाविद्यालयाच्या स्थापनेपासून भारती विद्यापीठाने उच्च शिक्षणक्षेत्रात प्रवेश केला, तसेच सर्वसामान्य विद्यार्थ्यांलाही उच्च शिक्षणाची संधी मिळाली पाहिजे, या हेतूने डॉ. पतंगराव कदम यांनी या महाविद्यालयाची मुहूर्तमेढ रोवली. विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण मिळून उपयोगाचे नाही, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे, ही साहेबांची भूमिका लक्षात घेऊन गेली ३८ वर्षे आमचे महाविद्यालय या राष्ट्रीय स्तरावरील आतंरमहाविद्यालयीन सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचे आयोजन करीत आले आहे. दि. ८ जानेवारी २०२३ रोजी डॉ. पतंगराव कदम यांच्या जयंतीनिमित्त व त्यांच्या अलौकिक कार्याचा वारसा पुढे चालवित आम्ही या वर्षीच्या स्पर्धा परिक्षेचा उपक्रम शनिवार, दि. ७ जानेवारी २०२३ रोजी ऑनलाईन आयोजित करीत आहोत.

या स्पर्धेचा लाभ लोकसेवा आयोगांच्या स्पर्धा परीक्षेसाठी दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांना जसा होतो, तसाच खुल्या गटातील युवकांनाही होतो. प्रतिवर्षी २० हजाराहून अधिक विद्यार्थी या स्पर्धा परीक्षेचा लाभ घेतात.

या ऑनलाईन स्पर्धेसाठी कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरापासून पदव्युत्तर पातळीपर्यंतचे महाविद्यालयीन विद्यार्थीच पात्र आहेत. प्रत्येक शाळा / महाविद्यालयाने किमान १00 विद्यार्थ्यांची प्रत्येकी फी रू १00/- प्रमाणे नोंदणी केल्यास संबंधित शाळेस अगर महाविद्यालयास परीक्षा केंद्र म्हणून मान्यता मिळू शकेल.

तेव्हा आपणाकडून अधिकाधिक प्रतिसाद मिळावा, अशी अपेक्षा.

कळावे.


**प्रा. (डॉ.) व्ही. ए. रणखांबे**
प्रभारी प्राचार्य
भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय)
यशवंतराव मोहिते कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
एरंडवणे, पुणे-३८

**डॉ. व्ही. पी. शिंदे**
संयोजक (वरिष्ठ विभाग)
९७३०३६४१४०

**प्रा.(डॉ). ए. बी. पवार**
प्रमुख संयोजक
९८२२५३९८८३

**प्रा. व्ही. ए. अडसूळ**
संयोजक (कनिष्ठ विभाग)
९४२३५२८५६०

व्यवसाय मार्गदर्शन व स्पर्धा परीक्षा विभाग
Email : ymcgkt@gmail.com


## महत्त्वाच्या नोंदी

**परीक्षा दिनांक** : शनिवार, दि. ७ जानेवारी २०२३
**परीक्षेची वेळ** : सकाळी १०.०० ते ११.३०
**प्रवेश शुल्क** : प्रत्येकी रू. १००/-
**नाव नोंदणी** : मंगळवार, दि. २० डिसेंबर २०२२ पर्यंत
**निकाल** : शनिवार, दि. २१ जानेवारी २०२३
**स्थळ** : यशवंतराव मोहिते कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पुणे -३८.

## पारितोषिके व प्रमाणपत्रे

| पारितोषिक | कनिष्ठ विभाग | वरिष्ठ विभाग |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | १०,०००/- | १०,०००/- |
| द्वितीय क्रमांक | ८,०००/- | ८,०००/- |
| तृतीय क्रमांक | ६,०००/- | ६,०००/- |

शंभरहून अधिक परिक्षार्थींनी नोंदणी केलेल्या (पारितोषिक विजेत्या महाविद्यालया व्यतिरिक्त) प्रत्येक महाविद्यालयास प्रथम क्रमांकाचे रु. १०००/- (एक हजार रु. फक्त) चे पारितोषिक देण्यात येणार आहे.

आपणा सर्वांना नूतन वर्षाच्या
हार्दिक शुभेच्छा